स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्‍यापीठ नांदेड

मानव विद्‍याशाखे अंतर्गत इतिहास विषयातील पीएच.डी पदवीसाठी सादर करण्यात येणारा संशोधन आराखडा

संशोधनाची रूपरेषा (Pre – Synopsis)

संशोधन विषय: ‘औरंगजेब कालीन हिंदुंची स्थिती: एक ऐतिहासिक अभ्यास (इ.स.१६५८ ते इ.स.१७०७)

संशोधक विद्‍यार्थी

श्री. अजय श्रीधर फड

सहाय्यक प्राध्यापक (तासिका तत्व)

महात्मा फुले महाविद्‍यालय किनगाव,

ता.अहमदपूर जि.लातूर

मो.नं ९४२०२१२१३३

संशोधक मार्गदर्शक

प्राचार्य. विठ्ठल व्यंकटराव घुले

राजर्षी शाहू महाविद्‍यालय परभणी

मो.नं. ९४२३४४२७३१

मार्च-२०२३

प्रस्तावना -

आज पासुन जवळपास पाचशे वर्षा पुर्वी इ.स. १५२६ मध्ये पानिपतच्या प्रथम युद्धामध्ये दिल्ली सुलतान शाहीचा अंतिम शासक ईब्राहिम लोदीचा निर्णायक पराभव करून बाबरने भारतात मुगल साम्राज्याची स्थापना केली. मध्ययुगीन भारताच्या इतिहासामध्ये मुगल साम्राज्याचे महत्वपूर्ण स्थान आहे. मुगलांनी भारताच्या खुप मोठ्या व विस्तृत प्रदेशावर जवळपास तीनशे वर्षे शासन केले. मुगलांच्या शासन काळाचा भारताच्या सामाजिक, आर्थिक, धार्मिक आणि सांस्कृतिक घटकांवर प्रभाव पडला. मुगल साम्राज्याच्या पुर्वीच्या दिल्ली सुलतान शाहीच्या शासकांचा हिंदु प्रती दृष्टीकोन हा दुषित आणि संकीर्ण होता. परंतु सुरवातीच्या मुगल बादशाह विशेषत: बादशाह अकबरने हिंदु प्रतींचा हा दृष्टीकोन बदलला व हिंदुं सोबत सहयोग व सद्भावनापूर्ण दृष्टीकोन स्वीकारला. परिणामी हिंदु विशेषत: राजपुतांचे समर्थन त्याने मिळवले. हिंदु समाजाचे समर्थन मिळवण्यासाठी त्याने जाचक असलेला जझिया कर व तीर्थयात्रा कर रद्द केला. जहांगीर आणि शाहजहांच्या शासन काळात हिंदु विरोधी धोरणांसाठी धार्मिक कारणां सोबतच काही अंशी राजकिय कारणे देखील कारणीभुत होती.

औरंगजेबाने सिहांसन काबीज केल्यानंतर त्याने मुगल साम्राज्याच्या धोरणांमध्ये अमुलाग्र बदल घडवुन आणला. आपल्या मुगल पुर्वजांचे काही अंशी असलेले उदारतापुर्ण धोरण त्यांने नष्ट करून पुर्णपणे धर्मांध व कट्टर धोरण लागु केले. औरंगजेबाने हिंदु समाजावर पुन्हा अत्याचारी जझिया कर लावला. तसेच त्याचे संग्रहण अत्यंत कठोरता पूर्वक केले. त्यामुळे हिंदु विशेषत: राजपुत जे अकबराच्या काळात मुगल साम्राज्याचे समर्थक होते त्यांच्या भावना दुखावल्या गेल्या. ज्यांचा परिणाम मुगल साम्राज्यासाठी नकारात्मकच झाला. औरंगजेबाच्या शासन काळात हिंदुंच्या सामाजिक जीवनावर देखील प्रतिबंध घालण्यात आले

होते. औरंगजेबाने हिंदु धर्मातील होळी, दिवाळी सारख्या सणांवर बंदी घातली होती. त्याने इस्लामला अधिकृतपणे राजधर्म बनवला व आपल्या बहुसंख्य असलेल्या हिंदु धर्मीय प्रजेला इस्लाम धर्मात परावर्तीत करण्याचा प्रयत्न देखील केला. हिंदुंच्या धर्म परिवर्तनासाठी त्याने वेगवेगळी आमिषे दाखवली. प्रशासकिय पदे, धनसंपत्ती, सन्मान तसेच शिक्षेपासुन माफी अशा साधनांचा औरंगजेबाने सर्रासपणे वापर केला. औरंगजेबाने शासकिय पदांपासुन हिंदुना वंचित ठेवले. मुगल साम्राज्याच्या सुरवाती पासुनच महसुल प्रशासनावर हिंदुंची पकड होती. म्हणुन औरंगजेबाने महसुल प्रशासनातील हिंदु कर्मचारी वर्गाला बडतर्फ करून त्यांच्या ठिकाणी मुस्लीम कर्मचारी नियुक्त केले. त्याची ही योजना यशस्वी होऊ शकली नाही कारण मुस्लीम कर्मचारी महसुल प्रशासनाच्या कामकाजाबाबत म्हणावे तेवढे पारंगत नव्हते. औरंगजेबाने मुगलांच्या शाही सेनेमध्ये हिंदुंना उच्च पद देण्यावर बंदी घातली होती. औरंगजेबाचे ध्येय हे भारताला 'दार-उल-इस्लाम' बनवणे हे होते. ते ध्येय्य पुर्ण करण्यासाठी त्याने हिंदुंचे दमन करण्याची कोणतीही संधी सोडली नाही. त्याने कित्येक मंदिरे नष्ट केली. हिंदु देवी--देवतांची विटंबना केली. सोमनाथ, काशी विश्वनाथ सारख्या प्रसिद्ध व हिंदुंची श्रद्धास्थान असलेल्या मंदिरांची तोडफोड केली. औरंगजेबाचे धार्मिक धोरण हे असहिष्णु होते. औरंगजेबाच्या हिंदु विषयक धोरणामुळे हिंदुंमध्ये असंतोष निर्माण झाला. ज्यामुळे मुगल साम्राज्याची शक्ती व शांती नष्ट झाली. त्यामुळे फक्त औरंगजेबच नाही तर संपुर्ण मुगल साम्राज्याचे पतन झाले.

- **विषय निवडीचा हेतू-**

मध्ययुगीन भारताच्या इतिहासातील एक शक्तिशाली सत्ता घराणे असलेल्या ज्यांनी जवळपास तीनशे वर्ष एक हाती शासन केले अशा मुघल शासकांपैकी एक शक्तिशाली कट्टरपंथी धर्मांध शासक असलेल्या औरंगजेबाच्या शासन काळातील बहुसंख्य असलेल्या हिंदूंची सामाजिक, आर्थिक, धार्मिक स्थिती चा अभ्यास करणे हा या संशोधन विषय निवडीचा हेतू आहे. या संशोधन कार्य अंतर्गत औरंगजेबाच्या शासन कार्यकाळात हिंदू समाजातील सामाजिक, आर्थिक व धार्मिक स्थितीचा आढावा घेण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

- **संशोधन विषयाचे महत्त्व -**

आपल्या भारत देशाला गौरवशाली इतिहास लाभला आहे. प्राचीन भारताच्या इतिहासात मौर्य, गुप्त, सातवाहन, वाकाटक, चालुक्य इत्यादी घराण्यांनी शासन केले. तर परकीय मुस्लिम आक्रमणानंतर दिल्लीवर विजय मिळवून मुस्लिम राजवटीची म्हणजेच दिल्ली सुलतानशाहीची सुरुवात झाली. नंतर 1526 मध्ये पानिपतच्या प्रथम युद्धात दिल्ली सुलतानशाहीचा अंत करून मुघल साम्राज्याची स्थापना झाली. या मुघल घराण्यात बाबर, जहांगीर, अकबर, शहाजहा, औरंगजेब हे शक्तिशाली शासक झाले या मुघल शासकांमधील शेवटचा शक्तिशाली शासक म्हणजे औरंगजेब.

औरंगजेब धर्मांध व कट्टरपंथी होता. त्याच्या शासन काळात हिंदूंची सामाजिक, आर्थिक, धार्मिक, स्थिती बिकट झाली होती. आधीच्या मुघल शासकांच्या विपरीत त्याने कट्टर धार्मिक धोरण स्वीकारले होते. ज्याचा परिणाम तत्कालीन संपूर्ण भारतावर झाला. त्यामुळे औरंगजेबाच्या शासन काळातील हिंदूंची स्थिती यावर प्रकाश टाकणे महत्त्वाचे आहे.

- **संशोधनाची व्याप्ती व मर्यादा -**

संशोधनाची व्याप्ती म्हणजेच संशोधन विषयाचे अभ्यासक्षेत्र होय. या संशोधन कार्यामध्ये मध्ययुगीन भारताच्या इतिहासातील मुगल साम्राज्याच्या काळाचा विशेषत: औरंगजेबाच्या शासन काळाचा अभ्यास केला जाणार आहे.संशोधनाच्या व्याप्ती मध्ये औरंगजेबाच्या शासन काळातील हिंदुंची सामाजिक, आर्थिक व धार्मिक स्थिती तसेच हिंदु स्त्रीयांच्या स्थितीचा विशेषत्वाने अभ्यास केला जाणार आहे. तसेच औरंगजेबाच्या शासनातील प्रशासकिय पदांवरील हिंदु मनसबदारांचा ही आढावा या संशोधन कार्यातुन घेतला जाणार आहे.

- **संशोधनाची उद्दिष्टे-**

१) एक शासक म्हणुन औरंगजेबाच्या कार्याचे मुल्यमापन करणे.

२) औरंगजेबच्या पुर्वकालीन मुस्लीम शासन काळातील हिंदुच्या स्थितीचा आढावा घेणे.

३) औरंगजेबाच्या शासन काळातील हिंदुंच्या सामाजिक स्थितीचा आढावा घेणे.

४) औरंगजेबाच्या शासन काळातील हिंदुंच्या आर्थिक स्थितीचा आढावा घेणे..

५) औरंगजेबाच्या शासन काळातील हिंदुंच्या धार्मिक स्थितीचा आढावा घेणे.

६) औरंगजेबाच्या शासन काळातील हिंदुं स्त्रीयांच्या स्थितीवर प्रकाश टाकणे

७) औरंगजेबाच्या शासन काळातील प्रशासकिय पदांवरील हिंदुंचा आढावा घेणे.

संशोधनाची गृहितके -

१) औरंगजेब हा कट्टरपंथी आणि असहिष्णु शासक होता.

२) औरंगजेबाचे राज्य सत्तेचे धोरण हे धर्मांध होते.

३) औरंगजेबाच्या धोरणांमुळे हिंदुंची सामाजिक स्थिती खालावली.

४) औरंगजेबाच्या धोरणांमुळे हिंदुंची आर्थिक स्थितीवर विपरित परिणाम झाला.

५) औरंगजेबाच्या धोरणांमुळे हिंदुंच्या धार्मिक अधिकारांवर बंधने आली.

६) मुगल साम्राज्याचे पतन होण्यास औरंगजेबाची धोरणे कारणीभुत होती.

- **पुर्व संशोधनाचा आढावा -**

१) औरंगजेबके शासनकाल मे राजनैतिक प्रतिरोध का इतिहास (१६५८-१७०७) - अनिल कुमार मिश्रा (२००२), व्ही.बी.एस.पुर्वांचल विद्यापीठ, जौनपुर (उ.प्र.)
या संशोधन कार्यामध्ये औरंगबाच्या शासन काळातील मुगल सत्तेच्या विरोधातील बंड, युद्ध यांच्या विषयीची माहिती देण्यात आली आहे.

२) मुगलकालीन हिंदु समाज (१५२६-१७०७) - ब्रजेंद्र कुमार सिंग (२००२), महात्मा गांधी काशी विद्यापीठ वाराणसी (उ.प्र)
- या संशोधन कार्यामध्ये मुगल सत्तेच्या स्थापने पासुन ते औरंगजेबाच्या शासनकाळा पर्यंतची हिंदु समाजा विषयीची माहिती दिली आहे.

३) मुगल काल मे जनसाधारण वर्ग का दैनिक जीवन- निशांत परवीन(२००९)
महात्मा गांधी काशी विद्यापीठ वाराणसी (उ.प्र)
- या संशोधन कार्यामध्ये मुगल शासन काळातील सामान्य वर्ग म्हणजे शेतकरी, मजूर, छोटे व्यापारी ईत्यादींच्या दैनंदिन जीवना विषयीची माहिती दिली आहे.

४) Mughal administration of the Deccan under Aurangzeb – Zakir Hussain (2015), IGNOU Delhi.
- या संशोधन कार्यामध्ये औरंगजेबाच्या शासन काळातील दख्खनच्या प्रशासकिय व्यवस्थे विषयीचे संशोधन करण्यात आले आहे.

५) औरंगजेब के शासन काल मे हिंदुओ कि स्थिती - त्रिपाठी दुर्गा दत्त (२०१०),डॉ.रामानंद लोहिया अवध विद्यापीठ, फैजाबाद (उ.प्र)

- या संशोधन कार्यामध्ये औरंगजेबाच्या शासन काळामध्ये हिंदु - मुस्लीम संबंध, मुगल - हिंदु राज्य संबंध या विषयीचे संशोधन केले आहे.

वरील सर्व पुर्व संशोधनाचा आढावा घेतला असुन माझे संशोधन कार्य हे वरील संशोधन कार्या पेक्षा वेगळे आहे.

- **संशोधन पद्धती -**

इतिहास विषयक लेखनाचे संशोधन करत असताना वेगवेगळ्या संशोधन पद्धतींचा वापर केला जातो. त्यामध्ये मुख्यतः वर्णनात्मक पद्धत व वस्तुनिष्ठवादी संशोधन, विश्लेषणात्मक संशोधन, सर्वेक्षणात्मक संशोधन, मार्क्सवादी संशोधन इत्यांदींचा प्रामुख्याने समावेश होतो. समाकालीन इतिहास विषयक संशोधन करत असताना विश्लेषणात्मक, सर्वेक्षणात्मक व वर्णानात्मक या संशोधन पद्धतींचा वापर केला जातो.

कोणत्याही विषयावर संशोधन करत असताना योग्य संशोधन पद्धतीचा अवलंब करणे अत्यंत महत्वाचे असते. कारण योग्य संशोधन पद्धती मुळेच संशोधनाच्या कार्यास शास्त्रीय स्वरूप प्राप्त होते. संशोधन कार्यात चुकिच्या संशोधन पद्धतीचा वापर केल्यास संशोधनाची उद्दिष्टे व गृहितके ही अपुर्ण राहुन संशोधन अयशस्वी होते. म्हणुन अचुक व परिणामकारक अशा संशोधन पद्धतीचा अवलंब महत्वपुर्ण आहे. त्यामुळे मी माझ्या “औरंगजेबज कालीन हिंदुंची स्थिती : एक ऐतिहासिक अभ्यास” या संशोधन कार्यासाठी ऐतिहासिक वर्णनात्मक आणि विश्लेषणात्मक या संशोधन पद्धतींचा अवलंब करणार आहे.

- **प्रकरण योजना -**

- प्रकरण पहिले - १७ व्या शतकाच्या पुर्वीची हिंदुंची स्थिती

या प्रकरणामध्ये औरंगजेबाच्या पुर्वीच्या शासन काळातील हिंदुंच्या स्थितीचा आढावा घेतला जाणार आहे.

- प्रकरण दुसरे - औरंगजेबाच्या काळातील हिंदुंची सामाजिक स्थिती

या प्रकरणामध्ये हिंदु जाती व्यवस्था, कुटुंब पद्धती, विवाह, आहार, मनोरंजन, सणे इत्यांदी विषयी माहिती घेतली जाणार आहे.

- प्रकरण तिसरे - औरंगजेबाच्या काळातील हिंदुंची आर्थिक स्थिती

या प्रकरणामध्ये कृषी व्यवस्था, दळणवळण, कर व्यवस्था, मुद्रा व्यवस्था, व्यापार अशा आर्थिक बाबींचा अभ्यास या प्रकरणात केला जाणार आहे.

- प्रकरण चौथे - औरंगजेबाच्या काळातील हिंदुंची धार्मिक स्थिती

या प्रकरणामध्ये हिंदु धर्मातील बहुदैववाद, प्रमुख तीर्थस्थळे, प्रचलित रूढी परंपरा, तसेच औरंगजेबाचे धर्मांध कार्य, हिंदूच्या परंपरांवर बंधने, सणांवर प्रतिबंध, मंदिरांचा विध्वंस, बलपूर्वक धर्म परिवर्तन आणि औरंगजेबाच्या धार्मिक धोरणांचे परिणाम यांचा आढावा घेतला जाणार आहे.

- प्रकरण पाचवे - औरंगजेबाच्या काळातील हिंदु स्त्रीयांची स्थिती.

या प्रकरणा अंतर्गत हिंदु स्त्रीयांचे समाजातील स्थान, वेगवेगळ्या कुप्रथा जसे पर्दा , हुंडा, सती प्रथा, बाल विवाह तसेच स्त्री शिक्षण अशा ईत्यादीं बाबींचां अभ्यास केला जाणार आहे.

- प्रकरण सहावे - औरंगजेबाच्या प्रशासनातील पदांवरील हिंदु.

या प्रकरणा मध्ये औरंगजेबाच्या शासनातील प्रशासकिय पदांवरिल हिंदु मनसबदारांची माहिती दिली जाणार आहे.

- प्रकरण सातवे - समारोप व निष्कर्ष

या प्रकरणांमध्ये वरील सर्व प्रकरणांचा अभ्यास करून शास्त्रशुद्ध पद्धतीने निष्कर्ष काढले जाणार आहेत.

- **संदर्भ ग्रंथसुची -**

१) अबुल फजल - * अकबरनामा (हिंदी अनुवाद) - मथुरालाल शर्मा, दिल्ली २००५

* आईने अकबरी (इंग्रजी अनुवाद) - यदुनाथ सरकार, कलकत्ता,१९४८

२) जहांगीर - * जाहंगीरनामा (हिंदी अनुवाद) - ब्रजरत्न दास, वाराणसी १९८९

३) औरंगजेब - * रूक्कात- ए- आलमगिरी (इंग्रजी अनुवाद) - जे .एच. बिलमोरिया, दिल्ली,२००९

* अहकम- ए- आलमगिरी (हिंदी अनुवाद) - भुदेव शास्त्री, आगरा,१९६७

४) यदुनाथ सरकार - * मुगल शासन पद्धती, आगरा, १९६४

* औरंगजेब (१६१८ - १७०७) जयपुर,१९८५

* इंडिया अंडर औरंगजेब - दिल्ली

५) चौबे आणि श्रीवास्तव - मध्ययुगीन भारतीय समाज एवं संस्कृति,लखनऊ,२००५

६) पी.एन ओझा - मुगलकालीन भारत का सामाजिक जीवन ,दिल्ली, १९८४

७) मथुरालाल शर्मा - मुगल साम्राज् का पतन ,ग्वालियर,१९६८

८) सतीष चंद्र - * मध्यकालीन भारत भाग १, भाग २,दिल्ली,२००७

* मुगलों की धार्मिक नीतियॉ, दिल्ली २००८

९) आर.पी. त्रिपाठी - मुगल साम्राज्य का उत्थान और पतन ,प्रयागराज,२००३

१०) एस. एम. जाफर - द मुगल इंपायर फ्रॉम बाबर टु औरंगजेब, दिल्ली, १९७४

संशोधक विद्यार्थी

श्री. अजय श्रीधर फड

संशोधक मार्गदर्शक

प्राचार्य. विठ्ठल व्यंकटराव घुले

राजर्षी शाहू महाविद्यालय परभणी